पोलीस अधिक्षक वाशिम

# प्रेस नोट

## सन २०१९ मधील रक्तदानाचा वाशिम जिल्हा पोलीस दलाने तोडला रेकॉर्ड

७३ व्या स्वतंत्र्य दिनानिमीत्त – वाशिम जिल्हा पोलीस दलाचा नाविन्यपुर्ण उपक्रम

७३ व्या स्वतंत्र्य दिनानिमीत्त वाशिम जिल्हा पोलीस दलामार्फत नाविन्यपुर्ण उपक्रम राबवित जुने पोलीस मुख्यालय, वाशिम येथे दिनांक १६.०८.२०१९ रोजी सकाळी रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर रक्तदान शिबीरामध्ये वाशिम जिल्हा पोलीस दलातील १०५ पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांनी तर ५ इतर नागरीकांनी रक्तदान करून जिल्हा सामान्य रूग्नालयातील रक्तपेडी करीता ११० बॅग रक्त पुरविले आहे.

जानेवारी २०१९ ते आजपावेतो जिल्हा सामान्य रूग्णालयातील रक्त पेढीने घेतलेल्या शिबीरांमध्ये ११० बॅग हा आजवरचा सर्वोच्च आकडा आहे. पोलीस दलामार्फत पोलीस अधिक्षक श्री वसंत परदेशी सरांनी रक्त देवून सदर शिबीराची मुहूर्तमेढ रचली त्यांचे नंतर अपर पोलीस अधिक्षक, वाशिम श्री विजयकुमार चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी, वाशिम श्री डॉ.पवन बनसोड, पोलीस उप अधिक्षक (गृह), श्री यशवंत केडगे, पोलीस निरीक्षक श्री शिवजी ठाकरे, श्री गिते, श्री श्रीराम घुगे इत्यादी अधिकाऱ्यांनी रक्त देवून सर्वांना रक्त देण्यास प्रेरणा दिली, आणि त्या पाठोपाठ केंव्हा ११० वर हा आकडा पोहेचला हे कळालेही नाही.

सदर शिबीरामध्ये महिला पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांनीही मोठ्या प्रमाणात आपला सहभाग नोंदविला.

शिबीरामध्ये रक्तदानाविषयी पोलीस अधिक्षक, वाशिम श्री वसंत परदेशी यांनी मार्गदर्शन केले. अचानक रस्त्यामध्ये होणारे अपघातामध्ये गंभीर दुखापत झालेल्या व्यक्तींना रक्ताची गरज असते तर गरजू रूग्णाना रक्ताची गरज भासते त्याकरीता वाशिम पोलीस दलाने जनतेच्या जिवीत व मालमत्तेचे रक्षण ह्या कर्तव्याबरोबरच जनतेच्या आरोग्याची काळजी घेण्याचेही कर्तव्य पार पाडले आहे.

आगामी सन उत्सवा दरम्यान अश्याच प्रकारच्या नाविन्यपुर्ण समाजोपयोगी कार्यक्रमाची योजना करून आदर्श समाज घडविण्याचे जनतेला पोलीस अधिक्षक, वाशिम यांनी अवाहन केले व अश्या प्रकारच्या समाजोपयोगी कार्यक्रमासाठी वाशिम जिल्हा पोलीसदल सदेव सहकार्य करेल याचीही ग्वाही दिली.

[ यशवंत केडगे ]
पोलीस उप अधिक्षक (गृह)
पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम.